**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

क्र. : मुमाआ-२०२१/नों. क्र.४०७६/त. क्र.७७/२४/०१

प्रति,
श्री.दिनकर कांबळे
४०, वानवडीगाव, पुणे-४११ ०४०

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-२२)
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

| | | |
|---|---|---|
| तक्रारीचा दिनांक | : | ३१-०३-२०२१ |
| सुनावणीचा दिनांक | : | ०२-०४-२०२४ |
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारदार यांनी दि.३१-०३-२०२१ रोजी आयोगाकडे केलेल्या तक्रारीवर स्वाक्षरी नाही. या तक्रारीमध्ये आयोगाकडे द्वितीय अपील दि.२७-०७-२०२० रोजी दिले त्यावर आयोगाने दि.०६-१०-२०२० रोजी आदेश दिले होते. वास्तविक पहाता तक्रार अर्जासोबत दि.०५-०२-२०२० रोजीचे पत्र व प्रथम अपिलीय अधिकारींचे आदेश जोडले आहेत. आयोगाकडे द्वितीय अपिल आदेश दिलेले नाहीत. तक्रारीमध्ये चुकीचे नमूद करण्यात आले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारदार अनुपस्थित. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नगर विकास विभाग श्री.शिवाजी चव्हाण उपस्थित आहेत.

अभिलेखावरुन स्पष्ट होते की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव श्री.सतीश मोघे यांनी दि.०६/१०/२०२० रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-२२) यांनी धारिका मा.मंत्री नगरविकास यांना पाठविल्याबाबत ई ऑफीस नोंदणीची प्रत अपिलार्थीना ७ दिवसात द्यावी तसेच मुद्दा क्र. १ व ३ ची माहिती विभागाकडून प्राप्त झाल्यावर माहिती देण्यात यावी आणि मुद्दा क्र. ४ बाबत मा.मंत्री यांचेकडून प्रथम अपिलीय अधिकारींच्या आदेशावर जन माहिती अधिकारींनी केलेल्या कार्यवाहीबाबत काही अभिलेख नाही.

सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नगर विकास विभाग श्री.शिवाजी चव्हाण यांनी सूचित केले की, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-२२) (सध्या अवर सचिव उद्योग, ऊर्जा विभाग कार्यरत) यांनी दि.०५-०२-२०२० रोजी उत्तर दिले होते.

प्रथम अपिलीय अधिकारींच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तांना उत्तर दिले होते.

सबब, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आदेश**

अर्जदाराचा तक्रार अर्ज अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission ★ Maharashtra ★

( समीर सहाय )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०४-२०२४